जि. प. बदल्यांची प्रक्रिया कायदेशीरच

शासनाच्या ग्रामविकास विभागाची स्पष्टोक्ती

नाशिक | प्रतिनिधी

नाशिक जिल्हा परिषदेच्या वतीने सन २०२५ च्या प्रशासकीय बदल्यांची प्रक्रिया ही संपूर्णपणे महाराष्ट्र शासनाच्या (दि. १५ मे २०१४) बदल्यांसंबंधीच्या शासन निर्णयाच्या तरतुदींच्या अनुरूप आहे. या प्रक्रियेमध्ये कोणतीही तांत्रिक अथवा कायदेशीर चूक झाली नाही, असा निर्वाळा ग्रामविकास विभागाच्या वतीने देण्यात आलेला आहे.

जि. प. तर्फे मे महिन्यात राबविण्यात आलेल्या गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या या शासनाच्या नियमानुसार योग्य पध्दतीने करण्यात आल्याच्या जि. प. प्रशासनाच्या भूमिकेवर राज्याच्या ग्रामविकास विभागाने शिक्कामोर्तब केला असून, नाशिक जिल्हा परिषदेकडून करण्यात आलेल्या बदल्यांची कार्यवाही ही शासन नियमांच्या चौकटीत राहून करण्यात आल्याचे लेखी पत्र ग्रामविकास विभागाने विभागीय आयुक्त कार्यालयाला पाठविले आहे.

नाशिक जिल्हा परिषदेच्या वतीने मे महिन्यात जिल्हास्तरावर बदली प्रक्रिया राबविण्यात आली होती. यामध्ये १५ टक्के बदल्या केल्यामुळे याबाबत जि. प. संघटनांकडून आक्षेप घेण्यात आला होता. मात्र जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी या बदल्या शासन निकषानुसारच करण्यात आल्याचे स्पष्ट केले होते. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून याबाबतचे पत्र (दि.२९मे) ग्रामविकास विभागाकडून याबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले होते.

त्यानुसार ग्रामविकास विभागाकडून कक्ष अधिकारी ज्योत्स्ना अर्जुन यांच्या स्वाक्षरीचे दिनांक २९ मे २०२५ रोजी विभागीय आयुक्त यांना पाठविण्यात आलेल्या पत्राच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या उत्तरात स्पष्ट करण्यात आले आहे की, शासनाच्या (दि. १५ मे २०१४) निर्णयानुसार प्रशासकीय बदल्यांचे प्रमाण १० टक्के बंधनकारक आहे, तर विनंतीवरून होणाऱ्या बदल्यांचे प्रमाण कमाल ५ टक्क्यांपर्यंत मर्यादित राहू शकते. त्याचप्रमाणे, बदल्या करताना महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ५ (२) नुसार कोणत्याही कार्यालयातील किंवा विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे प्रमाण एका वर्षात ३० टक्क्यांपेक्षा जास्त नसावे, ही अटही नाशिक जिल्हा परिषदेकडून पाळण्यात आली आहे. त्यामुळे नाशिक जिल्हा परिषदेमार्फत राबवलेली १५% बदल्यांची प्रक्रिया ही या अधिनियमाच्या अनुषंगाने सुसंगत असून, शासनाच्या या पत्रानुसार जि. प. प्रशासनाकडून आलेल्या बदल्या या संपूर्णपणे नियमानुसार असून, त्यात कोणतीही अनियमितता झालेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रशासनाने कायद्याच्या चौकटीत राहून बदल्यांची प्रक्रिया राबविल्याचे जि. प. प्रशासनाच्या वतीने स्पष्ट

यात्रा रद्द करून आर्थिक फसवणूक

नाशिक | प्रतिनिधी

यात्रेच्या बहाण्याने पैसे घेऊन यात्रा रद्द केली व पैसे परत नक्की करतो अशी आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत अभिमान त्र्यंबक पवार (६६, व्यवसाय शेती, रा. कुईकर नगर श्री श्री रविशंकर मार्ग नगरपालिका गार्डनजवळ वडाळा शिवार नाशिक) यांनी शौर्य यात्रा कंपनी येथे २१ मार्च ते अद्यापपर्यंत कंपनीचे मालक मयुरेश वाघ व त्यांचे सहकारी शाम मराठे, कल्पेश किरण पाटील यांनी बाली यात्रेला घेऊन जाण्याच्या बहाण्याने पवार यांच्याकडून ६० हजार रुपये घेतले होते. त्यानंतर त्यांनी ही यात्रा रद्द केली. मात्र, पवार यांना त्यांचे पैसे परत केलेच नाही. त्यामुळे आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर पवार यांनी पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. या प्रकरणी पुढील तपास उपनिरीक्षक प्रकाश नेमाने करीत आहेत.

इंद्रनील तनु, प्रसन्न वदन

भाग-१५

नंदन रहाणे

सौंदर्याचे आकर्षण ही एक सहज मानवी प्रवृत्ती असते. जे जे म्हणून काही सुरेख, सुरंग, सुगंध, सौष्ठवपूर्ण दिसेल त्याकडे माणूस आपोआप ओढला जातो. सुंदरतेचे वैशिष्ट्य हे असते की तिचे अस्तित्व स्वयंभू असते. हे सुंदर आहे, यांच्याकडे आकर्षित व्हा असे सांगावे लागत नाही. आकाशातले इंद्रधनुष्य, मोराचा फुललेला पिसारा, कड्यावरुन कोसळणारा धबधबा, सिंहाची दिमाखदार चाल, अंगभर फुलललेले गुलमोहराचे झाड, कुरणावर सळसळत जाणारा नाग, कमळांनी दाटलेले सरोवर, पदन्यासात रंगून गेलेली नृत्यांगना... हे सारेच आपले लक्ष चटकन् वेधून घेतात. त्यासाठी त्यांना वेगळे प्रयास करावेच लागत नाहीत! स्वयंसिध्द सौंदर्याची जादुही तशीच स्वयंस्फूर्त असते! तिच्या वलयाने माणूस मोहित होतोच होतो! सौंदर्याची आराधना आणि सामर्थ्याची उपासना जगात सर्वत्र केली जाते ती काही उगाच नव्हे... आपलेही जीवन तसेच बनावे अशी आंतरिक इच्छा त्यामागे वसत असते. ऐहिकाप्रमाणेच अध्यात्मातही सौंदर्याचाच बोलबाला आहे.

ज्यांचे पूजन, अर्चन आपण करतो, ते आपले देव पहा... सौंदर्याची, सामर्थ्याची एकेक संकल्पनाच त्यांच्यातून साकार केली गेलीय. वीणावादन करणारी धवलवस्त्रधारिणी सरस्वती असो की घोड्यावर स्वार झालेला रणावेशातला खंडोबा असो, कमळात उभी राहून धनवर्षा करणारी लक्ष्मी असो की प्रशांत मुद्रेने अभयहस्त दाखवणारा गौतम बुद्ध असो, १८ हातांत १७ प्रकारची आयुधे धारण करुन महिषासुराला मारणारी दुर्गा असो की उघड्या आकाशाखाली कार्यात्सर्ग मुद्रा धारण केलेला विराट बाहुबली गोम्मटेश्वर असो... या साऱ्यांकडे पाहताच, एकेका गुणाचा दैवी परमोत्कर्ष त्यांच्याठायी झाल्याचे आपल्याला जाणवते आणि मन श्रद्धेने लीन होते. भारतीय धार्मिक मनाने पूज्य मानलेल्या अशा सर्व देवदेवतांमध्ये आणि थोर सत्पुरुषांमध्ये जर सौंदयनिर्मितीच्या अंगाने सर्वोच्च शिखर कुठले गाठलेले असेल तर ते आहे... भगवान कृष्णाच्या रुपाने! गोकुळातल्या गवळ्याच्या घरात वाढलेला हा देव अगदी पाळण्यापासून रणांगणापर्यंत सर्वत्र परमसुंदरच दिसतो -

इंद्रनील तनु, प्रसन्न वदन ।
दर्शन दीप्त जाण ।
हीरयांचे ।।१।।
अडो नका, सरा,
पाहू द्या गोपाळ ।
डोळियां सुकाळ ।
होईल आजी ।।२।।
कंठी वैजयंती,
नयन पुंजाळती ।
आरत्या ओवाळती ।
गोपबाळा ।।३।।
काळासी अटक,
योगियांचे हेत ।
परसा भागवत ।
जवळी उभा
।।४।।

संत श्रीनामदेवांचे शिष्य व मित्र परसा भागवत यांचा हा अभंग लहानसा आहे; पण श्रीकृष्णाचे सौंदर्य फारच नेटकेपणाने वर्णन करतो. त्याच्या सावळेपणाचे दर्शन घेतांना बहुतेक कवींनी 'मेघ:श्याम' किंवा 'घन:श्याम' अशी विशेषणे वापरली आहेत. परसोबांनी 'इंद्रनील' रत्नाची उपमा देऊन बहार आणलीय, या कृष्णाच्या तनुचा म्हणजे त्वचेचा रंग कसा? तर नीलरत्नसारखा! एकाच शब्दात तरलसे चित्र उभे करून ते पुढे म्हणतात, याचे मुखमंडल अगदी प्रसन्न आहे. याचे दर्शन इतके तेजस्वी की जणू दीप्तिमंत हिऱ्यांचा कोशच दृष्टीपुढे आल्यासारखे वाटावे! त्याच्या आणि माझ्या आड नका येऊ, बाजूला सरा तुम्ही... मला त्या गोपाळास मन भरुन पाहू द्या... डोळ्यांना अगदी सुकाळ झाल्यासारखे वाटले पाहिजे. या कृष्णाने आपल्या कंठात वैजयंती माला धारण केलेली आहे. ती इतकी सुंदर आणखी दिव्य आहे की बघणाऱ्यांचे नयन देखील तेजाने पुंजाळल्यासारखे होतात. अशा या वृंदावनाच्या रंगनायकाला गोकुळातल्या गोपिका आरत्यांची तबके हाती घेऊन मन:पूर्वक ओवाळीत आहेत!

हा प्रसंग पाहतांना असे वाटते की, जणू काही काळच थांबला आहे आणि त्यांच्या साक्षात्काराचे ध्येय जपी, तपी, योगी, ऋषी, मुनी तपश्चर्या करतात, तो त्यांचा हेतूच इथे सफल झाला आहे. या परसा भागवताचे भाग्य किती थोर की मी या प्रसंगी त्या यदुरायाच्या अगदी जवळ उभा आहे!

पेट्रोलपंप संचालकाची आत्महत्या

नवीन नाशिक | माऊली लॉन्स येथील साई पेट्रोलियमचे संचालक कुणाल निंबा गोसावी (वय ३७, रा. तीर्थरूप बंगला, कालिका पार्क उंटवाडी) यांनी राहत्या घरात पंख्याला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी (दि. २४ जून) पहाटेच्या सुमारास घडली. दरम्यान त्यांचा भाऊ प्रसाद गोसावी यांनी तत्काळ त्यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केल्यानंतर त्यांना डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास हवालदार सोमनाथ गुंड करीत आहे.

विविध प्रश्नांसाठी सातपूर मनसेचे निवेदन

सातपूर | मनसेनेचे सातपूर विभाग अध्यक्ष सचिन सिन्हा यांच्या नेतृत्वाखाली सातपूर विभागीय अधिकारी यांना रस्त्यावर पडलेले खड्डे तसेच मलेरिया व डेंग्यूचे वाढते प्रमाण, अस्वच्छता व इतर विषयांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करणारे निवेदन देण्यात आले. सातपूर पोलीस ठाणे व गंगापूर पोलीस ठाणे येथे वाढत्या गुन्हेगारी अवैध धंदे व अमली पदार्थांची विक्री या संदर्भात निवेदन देण्यात आले. यावेळी महिला शहराध्यक्ष आरती खिराडकर, विशाल भावले, ज्ञानेश्वर बगडे, विजय अहिरे आदी उपस्थित होते

अशोका मार्ग येथे घरफोडी

नाशिक | घरात कोणी नसल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा ८ लाख ७५ हजार रुपयांच्या ऐवज चोरून नेल्याप्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

फिरोज शौकत शहा (३८, व्यवसाय दुचाकी खरेदी-विक्री,रा. अशोका मार्ग नाशिक) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार (दि. १८ ते २० जून) ते बाहेरगावी गेले होते. याचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या घरात प्रवेश करून कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने व दहा हजार रुपये रोख असा ८ लाख ७५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी पुढील तपास हवालदार डी. टी. गाढवे करीत आहेत.

कामांचे अग्रक्रम ठरवून मंजुरी घ्या : जिल्हाधिकारी

त्र्यंबकेश्वर विकासकामांबाबत आढावा बैठक

नाशिक | त्र्यंबकेश्वर परिसरातील सिंहस्थकामांचा आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला असून, या बैठकीत विकास कामांचा अग्रक्रम ठरवण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली त्र्यंबकेश्वरच्या सिंहस्थकामांची आढावा बैठक घेण्यात आली. सिंहस्थ कामांतर्गत राज्य शासनाने तीर्थस्थान विकासाच्या माध्यमातून २७५ कोटी रुपयांचा निधी त्र्यंबकेश्वर विकासासाठी वर्ग केला आहे. या अंतर्गत विविध विकास कामांचे नियोजन करण्यात आले असून, त्यांच्या प्रक्रियाही सुरु करण्यात आलेल्या आहेत. जसे त्या कामांचे डीपीआर तयार करणे, प्रशासकीय मंजुरीची तयारी करणे, कागदपत्रांची जुळवाजुळव करणे, या कामांना गती देण्यात आलेली असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले.

तयारी गतिमान असली तरी या कामांचा अग्रक्रम ठरवून त्यांना मंजुरी घेण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी या बैठकीमध्ये अधिकाऱ्यांना दिल्या. अधिकाऱ्यांनी केलेल्या नियोजनाचा आढावा जिल्हाधिकारी यांनी घेतला. कोणकोणत्या कामासाठी किती खर्च अपेक्षित आहे, कोणते काम आधी करावयाचे आहे, याबाबतही त्यांनी सविस्तर माहिती जाणून घेतली. तयार केलेल्या कामांचा आढावा, त्यांची स्थिती, त्यांची डीपीआर, टेंडरची तयारी, मंजुरी आधी विषयांची सविस्तर माहिती जाणून घेत अधिकाऱ्यांना कामाला गती देण्याचे आवाहन केले. पावसाळ्यानंतर प्रत्यक्ष विकास कामाला सुरुवात करणे क्रमप्राप्त असल्याच्या सूचनाही अधिकाऱ्यांना दिल्या.

आ. फरांदेंवर गुन्हा दाखल करा

जुने नाशिक | प्रतिनिधी

द्वारका परिसरातील सातपीर दर्गा भागात मनपाच्या वतीने अतिक्रमण कारवाई करण्यात आली होती. यावेळी पोलिसांवर दगडफेक झाली होती. या प्रकरणा मध्य नाशिकच्या भाजप आ. देवयानी फरांदे व त्यांच्या काही समर्थकांचा हात होता, असा आरोप करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात यावी, अशी मागणी हिंदू-मुस्लीम हक्क सुरक्षा व विकास महासमितीचे अध्यक्ष अंजुम मकराणी यांनी केली आहे. याबाबत त्यांनी न्यायालयात दाद मागितली असून, सातपीर दर्गा प्रकरणात पोलिसांवरील हल्ला हा आ. फरांदे आणि त्यांच्या समर्थक व कार्यकर्त्यांनी घडवून आणल्याचा आरोप करत त्यांच्यावर गुन्हा नोंद करण्याची मागणी करणारी याचिका दाखल केली आहे.

या याचिकेवर जिल्हा व सत्र न्यायालयात सुनावणी होऊन याप्रकरणी न्यायालयाने २६ जूनपर्यंत अहवाल सादर करण्याचे आदेश पोलिसांना दिले आहे.

निधन वार्ता...

चंदन संचेती

नाशिक | नामको बँक ओझर शाखेचे शाखाधिकारी चंदन देविदास संचेती (५१) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा आहे. ते विमा प्रतिनिधी सतीश संचेती, चंद्रकांत आणि योगेश यांचे बंधू होत.



विजय काळे

नाशिक | येथील मे.जाधव आणि काळे आर्किटेक्ट या फर्मचे जुने सुप्रसिध्द वास्तू विशारद विजय अंबादास काळे (८७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांनी आयुर्वेद सेवा संघ व इतर अनेक संस्थाची कामे साकारली आहेत.

संजय लोंढे

नाशिक | पंचवटीतील अमृतधाम परिसरातील अयोध्यानगरी येथील रहिवासी संजय रामदास लोंढे (५१) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ असा परिवार आहे.

वत्सलाबाई राजपूत

नाशिक | येथील वत्सलाबाई जामसिंग राजपूत यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, नातू असा परीवार आहे. राजेंद्र व नरेंद्र राजपुत यांच्या त्या मातोश्री व सिडको किराणा व्यापारी संघटनेचे माजी अध्यक्ष नाना जाधव यांच्या सासू होत.

क्लासिफाईड /सुपरमार्केट

पाहिजेत

हॉटेल संजय लिकर बार कळवण वेटर पाहिजे. मो. 9637777109 / 9370075335.
(25/06-BK-2311)

दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/26)
(CRINV-23-24JL/ CRG00555)

व्यसनमुक्ती

गॅरंटीने सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www.drpalve nashamukti kendra.in, १००% रिझल्ट. (09/01/26)
(CRINV-23-24JL CRG00554)

सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752.
(09/01/26)
(CRINV-23-24JL/ CRG00556)

हरवले

आमचे मालकीचे घर क्रमांक N-31/A-1/8/4, विजय नगर, माताजी चौक, नवीन सिडको, नाशिक-४२२००९ ही मिळकत असून सादर घराचे अलॉटमेंट लेटर, सेल डिड, ताबा पावती, ट्रान्सफर पेपर इ. आमचेकडून विजयनगर ते नाशिक या परिसरात हरविले आहेत. कोणाला मिळून आलेस फोन 7020798806 यावर संपर्क साधावा . ता.२५.६.२०२५. सही/- श्री. शंतनू बाबूराव सरोदे.
(CM-279)

जाहिरात छोटी ! किमया मोठी !!

नावात बदल

My old name Amjed Riaz Kagdi has been changed to my new name Amjad Riyaj Kagdi as per Aadhar No. 9685 7768 0790. (CM-280)

My old name Pathan Musarrat Jahan Sakhawat Khan has been changed to my new name Musarrat Jahan Sadique Shaikh as per Aadhaar No. 5307 3516 1764.
(CM-281)

I Hemlata Bharat Jagtap in my Son's Shubham Bharat Jagtap. in his 10th & 12th Marksheet my name is Yogita wrongly mentioned correct name is Hemlata Bharat Jagtap. both the person are same as per Aadhar card No. 4022 1845 6500. (CM-284)

My old name Deepak Lala has been changed to new name Deepak Suresh Lala as per Aadhaar No. 7126 4006 2864. (BK-2381)

My old name Suresh has been changed to new name Suresh Ramchand Lala as per Aadhaar No. 6003 4284 4119. (BK-2381)

वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.

या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

◆ **जाहिरात विभाग,** दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆**नाशिकरोड :** प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, बिटको पॉईंट. ०२५३-२४६२७५६◆ **निफाड :** मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॅण्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११००◆**दिंडोरी :** दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८८◆ **मालेगांव :** पांजरपोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळ्याजवळ. ०२५५४-२४३४६२२◆**सिन्नर :** दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.